विषय क्र. (६)

गुप्त

प्रत क्रमांक
विधि व न्याय विभाग/का. १५

## मंत्रिमंडळासाठी टिपण्णी

विषय- कोविड-१९ संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर व मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ३४२७ ऑफ २००० मध्ये दिलेल्या अंतरिम आदेशामध्ये सूचित केल्याच्या अनुषंगाने धर्मादाय संस्थांकडून आर्थिक पाठबळ मिळण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये सुधारणा करण्याबाबत.

**प्रस्तावना-**

मा.उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपीठाने रिट याचिका क्र.३४२७/२००० मधील दिनांक ३० मार्च २०२० च्या अंतरिम आदेशामध्ये कोविड-१९ च्या संसर्गामुळे शहरी भागात काम करणाऱ्या कामगारांचे त्यांच्या कुटुंबासह ग्रामीण भागाकडे होणारे स्थलांतर व या कालावधीत पुकारण्यात आलेली संपूर्ण बंदी आणि त्याचा अशा स्थलांतर करीत असलेल्या राज्यातील व परराज्यातील कामगार व त्यांच्या कुटुंबियांवर होणाऱ्या परिणामांवर भाष्य केले आहे.

२. अशा स्थलांतर करीत असलेल्या कामगार व त्यांच्या कुटुंबियांना अन्न, वस्त्र, निवारा व वैद्यकीय मदत, इ. संपूर्ण सुविधा शासनामार्फत पुरविणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करून अशा सुविधा पुरविण्याबाबत मा. न्यायालयाने शासनास निदेश दिले आहेत.

३. यासाठी आवश्यक निधी उभारण्यासंदर्भात काही मार्ग सूचित करतांना मा. न्यायालयाने महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० व वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदींचा वापर करून त्याखाली धर्मादाय आयुक्त आणि राज्य शासनास प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून सदर अधिनियमांखाली नोंदणीकृत सर्व धर्मादाय संस्थांना, राज्य शासन ठरवेल त्या प्रमाणात धर्मादाय संस्थेची ठराविक रक्कम धर्मादाय हेतूसाठी जमा करण्यासाठी आदेश देता येतील असे सूचित केले आहे.

४. मा. उच्च न्यायालयाने त्याअनुषंगाने सदर अधिनियमांतील काही तरतूदी उद्धृत केल्या आहेत. मा. उच्च न्यायालयाने महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील कलम ६९ सह कलम ३ व कलम ८४ (२) (v) आणि वक्फ अधिनियम,१९९५ च्या कलम ७७ व ९७ चा उल्लेख केला आहे.

५. वरील बाबींची तपासणी करून वर नमूद प्रयोजनासाठी निधी उभारण्यासाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम आणि वक्फ अधिनियमांखाली नोंदणीकृत धर्मादाय संस्थांना धर्मादाय हेतूसाठी काही रक्कम/सहाय्य जमा करण्यासाठी,

अधिनियमातील तरतुदींचा वापर करून, अधिनियमाच्या उद्देशाशी सुसंगत निर्णय राज्य शासनाने घेण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने उपरोक्त आदेशान्वये स्पष्ट केले आहे.

६. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० हा विधि व न्याय विभागामार्फत प्रशासित केला जातो. मा. उच्च न्यायालयाच्या वर नमूद आदेशाच्या अनुषंगाने सध्या अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या तरतुदींप्रमाणे, सदर अधिनियमाखाली नोंदणीकृत सर्व धर्मादाय संस्थांना धर्मादाय उद्देशासाठी ठराविक रक्कम मदत करणे/जमा करण्यासाठी आदेश देता येतील का याची तपासणी केली असता अस्तित्वात असलेल्या तरतुदींप्रमाणे असे आदेश देता येणार नाहीत, असे दिसते.

तसेच करोनासारख्या भयानक संकटाचा सामना करण्यासाठी निधीची मोठ्या प्रमाणात आवश्यकता भासते.

७. या संदर्भात धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, यांच्याकडून प्राप्त प्रस्तावाचा सर्वकष विचार करून महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या तरतुदींचा वापर करून अधिनियमांखालील अधिकाराचा वापर करून नोंदणीकृत संस्थांना आर्थिक मदत जमा करण्यासाठी आदेश देण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या तरतुदींमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. ज्यायोगे Epidemic Disease Relief Fund & Disaster Relief Fund असा एक स्वतंत्र निधी निर्माण करून तो निधी धर्मादाय संस्थानकडून, शासन निश्चित करेल अशा ठराविक दराने धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे अधिपत्याखाली जमा करून असा निधी सध्या उद्धभवलेल्या कोविड-१९ किंवा अशा प्रकारच्या अन्य अभूतपूर्व संकटाचा सामना करण्यासाठी यासंदर्भात निर्माण केलेल्या विशेष सहायता निधी खात्यात वर्ग करून त्याचा विनियोग सध्या सारख्या निर्माण झालेल्या आपत्कालीन स्थितीत वापरता येईल.

८. यास्तव सध्या अस्तित्वात असलेल्या अधिनियमाच्या तरतुदींमध्ये खालीलप्रमाणे **सुधारणा प्रस्तावित** करण्यात येत आहे.

| कलम क्र. | सध्याची तरतूद | प्रस्तावित तरतूद |
|---|---|---|
| Chapter VIII Title | Public Trust Administration Fund | **Addition** "and Epidemic Disease Relief Fund & Disaster Relief Fund" |
| section 57A | - | **To be Newly Inserted** 57A. Notwithstanding anything contained in this Act, there shall be established a separate Epidemic Disease Relief Fund & Disaster Relief Fund, in the event |

| | | |
|---|---|---|
| | | of invoking provisions of the Epidemic Disease Act, 1897, upon outbreak of any dangerous epidemic disease or occurrence of any disaster as contemplated in section 2(d) of the Disaster Management Act, 2005 in the State. The Fund shall vest in the Charity Commissioner and will be appropriated by the Charity Commissioner, as prescribed. The Public Trusts, subject to exemption by the State Government by a general or special order, shall contribute the percentage of its Gross Annual Income, as prescribed." |
| section 84(2)(v-2) (Rule making powers) | - | **To be Newly Inserted.** "(v-2). For the quantum of percentage to be contributed by the Public Trusts towards Epidemic Disease Relief Fund & Disaster Relief Fund and for the transfer of the said Fund by the Charity Commissioner to the Chief Minister Relief Fund." |
| section 84(3) | (3) All rules made under this section shall be subject to the condition of previous publication. | **To be Amended** (3) **Except when the rules are made under section 57A,** all rules made under this section shall be subject to the condition of previous publication, |

९. **विभागाचे अभिप्राय-**

प्रस्तावित निधी स्वतंत्रपणे धर्मादाय आयुक्त यांच्या अधिपत्याखाली जमा करून कोरोना सारख्या आपत्कालीन परिस्थितीत, हा निर्माण केलेला विशेष सहायता निधी, शासनाच्या आदेशान्वये वर्ग करण्याचे प्रस्तावित आहे. या प्रस्तावित निधीच्या निर्मितीमुळे शासनाच्या तिजोरीत कोणतीही भर पडणार नाही अथवा घट होणार नाही. त्यामुळे या प्रकरणी वित्त विभागाच्या मान्यतेची आवश्यकता नाही. यास्तव वित्त विभागाचे अभिप्राय घेण्यात आलेले नाहीत.

१०. **मंत्रिमंडळाच्या मान्यतेकरिता प्रस्ताव-**

वरील पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये प्रस्तावित सुधारणेस मंत्रिमंडळाची मान्यता मिळावी.

दिनांक : ६ एप्रिल २०२०

ठिकाण : मुंबई

सचिव (विधिविधान)

विधि व न्याय विभाग

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Public Trust (Amendment) Ordinance, 2020 (Mah. Ord. .... of 2020), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA G. BHAGWAT,
Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

[Translation in English of the Maharashtra Public Trust (Amendment) Ordinance, 2020 (Mah. Ord. .... of 2020), published under the authority of the Governor].

**LAW AND JUDICIARY DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the April 2020.

**MAHARASHTRA ORDINANCE No. ......OF 2020.**

AN ORDINANCE

further to amend the Maharashtra Public Trust Act, 1950.

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Public Trust Act, 1950, for the purposes hereinafter appearing ;

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (1) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

1. (1) This Ordinance may be called the Maharashtra Public Trust (Amendment) Ordinance, 2020.

(2) It shall come into force at once.

2. In the title of Chapter VIII of the Maharashtra Public Trust Act, 1950 (hereinafter referred to as "the principal Act"), after existing words following words shall be inserted, namely:-

"and Epidemic Disease Relief Fund & Disaster Relief Fund"

3. After section 57 of the principal Act, the following section shall be inserted, namely:—

"57A. Notwithstanding anything contained in this Act, there shall be established a separate Epidemic Disease Relief Fund & Disaster Relief Fund, in the event of invoking provisions of the Epidemic Disease Act, 1897, upon outbreak of any dangerous epidemic disease or occurrence of any disaster as contemplated in section 2(d) of the Disaster Management Act, 2005 in the State. The Fund shall vest in the Charity Commissioner. The Public Trusts, subject to exemption by the State Government by a general or special order, shall contribute the percentage of its Gross Annual Income, as prescribed."

4. In sub-section (2) of section 84 of the principal Act, after clause (v-1) following clause shall be inserted, namely:-

"(v-2). For the quantum of percentage to be contributed by the Public Trusts towards Epidemic Disease Relief Fund & Disaster Relief Fund and for the transfer of the said Fund by the Charity Commissioner to the Chief Minister Relief Fund."

5. Sub-section (3) of section 84 of the principal Act, shall be amended, namely:-

"Except when the rules are made under section 57A, all rules made under this section shall be subject to the condition of previous publication."

6. (1) If any difficulty arises in giving effect to the provisions of the principal Act, as amended by this Ordinance, the State Government may, as occasion arises, by an order published in the Official Gazette, do anything not inconsistent with the provisions of the principal Act, as amended by this Ordinance which appears to it to be necessary or expedient for the purpose of removing the difficulty.

(2) Every order made under sub-section (1) shall be laid, as soon as may be, after it is made, before each house of the State Legislature.

**Mumbai,**
**Dated the April 2020.**

**Bhagat Singh Koshyari**
**Governor of Maharashtra.**

**By order and in the name of the Governor of Maharashtra,**

**Principal Secretary and R.L.A.,**
**Law and Judiciary Department**